मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 'पवित्र पोर्टल'कडे शिक्षकांची मागणीच नाही

## पालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाचे दुर्लक्ष : कायमस्वरूपी शिक्षक मिळण्यात अडचण

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्राथमिक शिक्षण विभागाने 'पवित्र पोर्टल'मधून ३२७ शिक्षकांची मागणी करणे आवश्यक आहे. मात्र, सन २०२२ च्या 'पवित्र पोर्टल'मध्ये महापालिकेने शिक्षकांच्या रिक्त पदांची मागणी न केल्याची माहिती समोर आली आहे. परिणामी, मराठी, उर्दू व हिंदी माध्यमांच्या शाळांना कायमस्वरूपी प्राथमिक शिक्षक मिळू शकले नाहीत. दरम्यान, दोन वर्षापासून मानधनावरील शिक्षकांची मेगा भरती सुरू आहे. त्यातही उर्दू माध्यमांच्या शाळांना सापत्न वागणूक दिली जात असल्याचा आरोप होत आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळेत सध्या शिक्षकांची संख्या कमी आहे. त्यामुळे अध्यापनावर परिणाम झाला असून, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. राज्यभर शिक्षक भरती ही शासनाने निर्माण केलेल्या 'पवित्र पोर्टल'च्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे कोणत्या जागी किती जागांची भरती आहे, त्याबाबत निश्चित माहिती या पोर्टलच्या माध्यमातून प्राप्त होते. त्यामुळे पवित्र पोर्टलद्वारे करण्यात येणारी भरती करणे आवश्यक असते. प्राथमिक शिक्षण विभागाचे तत्कालीन प्रशासन अधिकारी यांनी रिक्त पदांच्या जाहिराती शासनाच्या 'पवित्र पोर्टल'कडे दिल्या नाहीत. प्राथमिक शिक्षण विभागाने संदर्भीय २ नुसार राज्य स्तरावरून पवित्र पोर्टलच्या माध्यमातून नवनियुक्त प्राथमिक शिक्षण सेवकांच्या नियुक्तीसाठी मागणी न करता ३० नोव्हेंबर २०२२ रोजी २८५ रिक्त असलेल्या जागांसाठी मानधन तत्त्वावर महापालिकास्तरावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. संदर्भीय १ नुसार पुन्हा मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात शिक्षकांच्या नियुक्तीसाठी पिंपरी महापालिकास्तरावर मराठी माध्यमाच्या २४५, उर्दू माध्यमासाठी ६६ आणि हिंदी माध्यमाच्या १६ अशा रिक्तपदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.



### 'उर्दू'कडे प्रशासनाकडून दुजाभाव?

» उर्दू शाळेत ६६ शिक्षकांची पदे रिक्त असताना संपूर्ण पदे भरण्याकडे महापालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप पिंपरी-चिंचवड एज्युकेशन सोसायटीने केला आहे. उर्दू माध्यमाच्या एकाही शिक्षण सेवकाची पवित्र प्रणालीद्वारे नियुक्ती केली नाही. महापालिकेने राबविलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेला ४०० उमेदवार आले असतानाही केवळ ३० जागांवरच भरती प्रक्रिया पूर्ण केली आहे.

"रिक्त असलेल्या सर्व जागा पुन्हा नव्याने पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भरती करण्यासाठी आम्ही नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांची नुकतीच भेट घेतली. महापालिका प्राथमिक शिक्षण विभागात रिक्त पदांवर पवित्र पोर्टलमार्फत कायमस्वरूपी शिक्षक मिळावेत, अशी मागणी केली आहे.

- मनोज मराठे, राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र पदवीधर, प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटना.

सध्या पहिली यादी जाहीर झाली आहे. यामधील काही जण अनुपस्थित राहिल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना संधी दिली जाते. हीच प्रक्रिया मराठी माध्यमाच्या शाळांनाही लागू आहे. रिक्त पदांवर शिक्षकांची नियुक्ती केली जाणार आहे.

- विजयकुमार थोरात, सहायक आयुक्त शिक्षण विभाग

# 'एबीसी आयडी'त एमआयटी आर्ट, डिजाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठ अव्वल

## पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना होणार अनेक फायदे; युजीसीकडूनही कौतुकाची थाप

**पिंपरी | प्रतिनिधी**

आंतरविद्याशाखीय शिक्षण आणि ऐच्छिक विषयांतील श्रेयांकांच्या हस्तांतरासाठी हा आयडी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असून, त्यासाठीच युजीसीकडून विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर आपली नोंद करण्याचे आवाहन करण्यात आले होते. युजीसीच्या या आवाहनाला उत्तम रित्या प्रतिसाद देत एमआयटी एडीटी विद्यापीठाने तब्बल १५,५६६ हून अधिक खात्यांची नोंदणी तसेच त्यामध्ये २८,२०२ हून अधिक क्रेडिट्सचा अंतर्भाव करून राज्यातील खासगी विद्यापीठांच्या यादीत बाजी मारली. या यादीत एमआयटी विश्वशांती विद्यापीठ(खाती-१५,१७६, क्रेडिट- ५५६१) दुसऱ्या तर अमेठी विद्यापीठ(खाती-७१५८, क्रेडिट-११५९८) तिसऱ्या क्रमांकावर आहे.

आतापर्यंत देशभरातील एक हजार ५९७ संस्थांमधील दोन कोटींहून अधिक विद्यार्थ्यांनी एबीसी आयडी तयार केला आहे. यामध्ये महाराष्ट्रात देशात सर्वांधीक ४० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सर्वच विद्यापीठे, शैक्षणिक संस्था आणि महाविद्यालयांनी 'एबीसी' खात्यामध्ये विद्यार्थ्यांचे गुण भरण्यास सुरवात केली आहे. त्यात राज्यातील खाजगी विद्यापीठेही कुठेही मागे राहिलेली नाहीत. नुकत्याच झालेल्या आभासी बैठकीत युजीसीने एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या कामगिरीची नोंद घेत कौतुक देखील केले आहे, अशी माहिती विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. ज्ञानदेव नीलवर्ण यांनी दिली आहे.




### विद्यार्थ्यांना होणार हे फायदे

- विद्यार्थ्यांना इतर विद्यापीठे किंवा शैक्षणिक संस्थांतून मिळालेली श्रेयांक सहज हस्तांतरित होतील.
- 'गॅप' घेऊन परतलेल्या विद्यार्थ्याला पुन्हा बँकेतील श्रेयांक वापरता येतील.
- आवडते किंवा कौशल्याभिमूख अभ्यासक्रमांच्या गुणदानाची प्रक्रिया सुलभ होईल.
- देशातील कोणत्याही शैक्षणिक संस्थेतून श्रेयांक प्राप्त करात येईल.

### एबीसी आयडी म्हणजे काय?

» ज्याप्रमाणे आपण बँकेतील खात्यात जमा केलेली रक्कम आपण कोठेही आणि केव्हाही काढू शकतो. अगदी तसेच विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेले श्रेयांक(क्रेडिट) या आयडीच्या माध्यमातून ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडीटमध्ये जमा होतील. विद्यार्थ्याला जेंव्हा पदवी प्राप्त करायची असेल, तेंव्हा शैक्षणिक संस्था या श्रेयांकाचा वापर करू शकते. विद्यार्थी संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन आयडी ओपन करू शकतात.

# पंतप्रधान आवास योजनेतील घरांची पालिका करणार तपासणी

## खराडीतील पंतप्रधान आवास योजनेत अनेक घरमालकांनी भाडेकरू ठेवले असून तेथे 70 टक्के भाडेकरू असल्याची माहिती समोर

**पुणे | प्रतिनिधी**

खराडीतील पंतप्रधान आवास योजनेत अनेक घरमालकांनी भाडेकरू ठेवले असून तेथे ७० टक्के भाडेकरू असल्याची माहिती समोर आल्यावर महापालिका कामाला लागली आहे. पालिकेच्या अधिकाऱ्यांकडून आता तेथील घरांची तपासणी केली जाणार असून जेथे भाडेकरू आढळून येतील त्या घरमालकांना नोटीस देण्यात येणार आहे. त्यानंतर कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला जाणार असल्याची माहिती योजनेची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांनी 'सीविक मिरर'ला दिली. यामुळे ज्या घरमालकांनी घरे भाड्याने दिली आहेत त्यांचे धाबे दणाणले आहे.

पंतप्रधान आवास योजनेतून अल्पदरात घरे उपलब्ध करून दिली जातात. सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न पूर्ण व्हावे, शहरात स्वतःचे घर नाही, त्यांना घर मिळावे, यासाठी पुणे पालिकेकडून ही योजना विविध ठिकाणी राबविण्यात आली आहे. त्यानुसार लाभार्थ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते घरे देण्यात आली आहेत. घरमालकांनी घरे ताब्यात घेतली. योजनेतून घरे मिळाल्यानंतर घरमालकांनी मोठ्या आनंदाने सदनिकेत प्रवेश केला. काही मालकांनी घराची पूजा करून घरात आपणच राहणार असल्याचे भासवले. मात्र आपली सदनिका प्रकल्पातील प्रमुखाला आणि पालिकेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून भाडेतत्त्वावर दिल्याचे समोर आले आहे. त्यामुळे खरंच या योजनेतून गरजवंतांना घरे मिळाली आहेत की राजकीय आशीर्वादाने मर्जीतील कार्यकर्त्यांना घरे मिळाली आहेत, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. त्यामुळे आता पालिकेच्या अधिकाऱ्यांनी घरमालकांची तपासणी करून कडक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.



### अधिकाऱ्यांचा भाडेकरूंना आशीर्वाद ?

» खराडीमध्ये आयटी क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे येथील सोसायट्यांमध्ये वन बीएचके सदनिकेसाठी भाडे १५ ते २५ हजार आकारले जाते. त्या तुलनेत या योजनेतील घरांना १४ ते १६ हजार रुपये भाडे आकारले जात असल्याचे सांगण्यात येते. ही बाब बाहेर येऊ नये, पालिकेकडून तपासणी होऊ नये, यासाठी पालिकेच्याच अधिकाऱ्यांना एका सदनिकेसाठी दोन हजार रुपये दिले जात असल्याचा आरोप काही नागरिकांनी केला आहे. तसेच बड्या राजकीय नेत्याचे नाव सांगून भाडेकरू ठेवले जात आहेत. या प्रकल्पातील शिवनेरी ए आणि बी, पीएमवायए सहकारी गृह. संस्था मर्यादित या सोसायट्या स्थापन झाल्या असून सभासदांकडे संस्था हस्तांतरित केल्या आहेत. त्यामुळे आता या संस्थांचा कारभार सभासदांकडून पाहिला जात आहे. यात सभासदही सहभागी आहेत का, याचीही चौकशी करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

### यापूर्वीही मिळाले होते भाडेकरू

» यापूर्वी वडगाव शेरी, खराडी पीएम आवास योजनेत घरमालकांनी भाडेकरू ठेवल्याची माहिती समोर आली होती. त्यावेळी तपासात पाच भाडेकरू राहात असल्याचे आढळून आले होते. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी कारवाई केली जाईल, असे जाहीर केले होते. मात्र त्यानंतर कोणतीही कारवाई झाली नाही. या सदनिका भाड्याने देणाऱ्या लाभार्थ्यांना साधी नोटीस बजावण्याचे कष्टही अधिकाऱ्यांनी घेतले नव्हते. खराडीत तर अद्याप काहीच कारवाई करण्यात आलेली नाही.

### प्रतिज्ञापत्र देऊन फसवणूक

» ज्यांचे शहरात स्वतःचे घर नाही, अशा कुटुंबांना परवडणाऱ्या किमतीमध्ये घर उपलब्ध करून देणे, हा पीएम आवास योजनेचा मूळ उद्देश आहे. योजनेचा अर्ज भरताना तसेच सदनिकेची खरेदी करताना स्वतःच्या नावावर घर नाही, मिळालेले घर भाड्याने देणार नाही, असे प्रतिज्ञापत्र संबंधित घरमालकाने दिले आहे. असे असतानाही खराडी प्रकल्पातील अनेक सदनिका लाभार्थ्यांनी आपली घरे भाड्याने दिली आहेत. ही एक प्रकारे पालिकेची आणि शासनाची फसवणूक म्हणावी लागेल. त्यामुळे आता महापालिकेकडून नेमकी काय कारवाई केली जाणार याकडे लक्ष लागले आहे.

# शेतकऱ्याला धमकावल्याप्रकरणी मनोरमा खेडकर यांना 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी

## 20 जुलैरोजी पोलिस कोठडी संपली, मनोरमा खेडकरचा जामीन नामंजूर, फायरिंग झाले नाही निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न

**पुणे | प्रतिनिधी**

मुळशी तालुक्यातील धडवली येथे शेतकऱ्यांना मारहाण केल्या प्रकरणी अटकेत असलेल्या मनोरमा खेडकर (रा. नँशनल हाउसिंग सोसायटी, बाणेर पुणे) यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनविण्यात आली. त्यांचा जामीन नामंजूर करण्यात आला आहे.

मुळशीतील घडवली गावात शेतकऱ्यांना मनोरमा खेडकर यांनी पिस्तुलाचा धाक दाखवून धमकाविल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. याप्रकरणी शेतकरी पंढरीनाथ कोंडीबा पासलकर (वय ६५, रा. केडगाव, आंबेगाव पुनर्वसन, ता. दौंड) यांनी पौड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. याप्रकरणी मनोरमा खेडकर यांच्यासह सात जणांविरुद्ध पौड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केल्यानंतर पुणे ग्रामीण पोलिसांचे स्थानिक गुन्हे अन्वेषण पथक सोमवारी सकाळी बाणेरमधील खेडकर यांच्या बंगल्यावर धडकले होते. मात्र, कारवाईची कुणकुण लागल्यामुळे खेडकर दाम्पत्य थांबले नसल्याचे आढळून आले. मनोरमा दिलीप खेडकर, दिलीप खेडकर (दोघे रा. नॅशनल हौसिंग सोसायटी, बाणेर), अंबादास खेडकर (रा. आंबी, ता. हवेली) यांच्यासह सात जणांविरुद्ध पौड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. खेडकर यांच्यासोबत शेतकऱ्यांना धमकाविण्यासाठी आलेल्या अंगरक्षकांविरुद्ध (बाऊन्सर) गुन्हा दाखल आहे. आरोपींमध्ये महिला अंगरक्षकांचाही समावेश आहे.



### मनोरमा खेडकरांचा जामीन नामंजूर

» मंगळवारी (दि. २२) मनोरमा खेडकरला पौड येथे न्यायदंडाधिकारी सुधीर. जी. बरडे यांच्या न्यायालयापुढे हजर करण्यात आल्यानंतर त्यांचा जामीन नामंजूर करण्यात आला. तसेच १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनविण्यात आली. यावेळी सरकारी वकीलांनी आणखी काही आरोपी असून तपास सुरू असल्याचे न्यायालयाला सांगितले. तर फायरिंग झाले नाही, तसेच कोणाला जखमही झालेली नाही, असे मनोरमा खेडकरच्या वकीलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला.

### 20 जुलैरोजी पोलिस कोठडी संपली

» पौड पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेने महाडमधून मनोरमा खेडकरला गुरूवारी (दि. १८) सकाळी अटक केली. त्यानंतर पौड येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सुधीर. जी. बरडे यांच्या न्यायालयापुढे हजर करण्यात आल्यानंतर मनोरमा खेडकरला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनविण्यात आली होती. ती कोठडी २० जुलै रोजी संपल्यानंतर पुन्हा खेडकरला न्यायालयात हजर करण्यात आले असता तिला २२ जुलैपर्यंत दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनविण्यात आली होती.

# टोलेजंग इमारतींना सुरक्षा, नागरिकांच्या घरांवर बुलडोझर

## क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या 'अर्थपूर्ण' वाटाघाटीमुळे खास इमारतींना अभय : विनापरवानगी गृहप्रकल्पाच्या स्लॅबनुसार अधिकाऱ्यांना पैसे?

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका कार्यक्षेत्रातील थेरगांव, वाल्हेकरवाडी, चिखली, तळवडे यासह अनेक भागात विनापरवानगी गृहप्रकल्पांची बांधकामे जोरात सुरू आहेत. त्या घरांची विक्री मोठ्या प्रमाणात सुरू आहे. मात्र, एकाच ठिकाणी ठाण मांडून बसलेल्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून सर्वसामान्य नागरिकांच्या अनधिकृत घरांवर बुलडोझर चालवला जात आहे. परंतु, राजकारणी लोकांचे पाठबळ मिळालेल्या बांधकाम व्यावसायिकांच्या विनापरवानगी बांधलेल्या गृहप्रकल्पांना सुरक्षा दिली जात आहे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या अर्थपूर्ण वाटाघाटींमुळे त्या गृहप्रकल्पांना अभय मिळत आहे.



त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या घरांवर बुलडोझर चालवणारे क्षेत्रीय अधिकारी हे राजकारण्यांनी पाठबळ दिलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करणार का, असा सवाल सामान्य नागरिकांनी उपस्थित केला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'ब', 'ग', 'फ', 'क' आणि 'इ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत मोठ्या विनापरवानगी बांधकामे सुरू आहेत. दरम्यान, महापालिकेच्या फ क्षेत्रीय हद्दीतील चिखली, तळवडे परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरू आहेत. महापालिका बांधकाम विभागाची कसलीही परवानगी न घेता छोटे बांधकाम व्यावसायिकांकडून टोलेजंग इमारती उभारत आहेत. ताम्हाणेवस्ती, म्हेत्रेवस्तीतून जाणा-या नियोजित ८० फुटी डीपी रोडवर विनापरवानगी बांधकामे सुरू आहेत. तळवडेतील देवभूमी परिसरात तब्बल ७० ते ८० विनापरवानगी इमारती उभ्या केलेल्या आहेत. या चार ते पाच मजली इमारती बांधून त्या ठिकाणी प्रत्येक खोल्या भाड्याने दिलेल्या आहेत. तळवडे सहयोगनगर, रुपीनगर, चिखलीतील मोरेवस्ती, म्हेत्रेवस्ती, चिंचेचा मळा परिसरात राजकीय पाठबळ मिळालेल्या बांधकाम व्यावसायिकांना धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली आहे. भोसरीतील एका राजकीय नेत्याच्या पाठिंब्यामुळे ही अनधिकृत बांधकामे होताना दिसत आहेत. समाविष्ठ गावातील एक, दोन, पाच व दहा गुंठे जागा खरेदी करत ही अनधिकृत बांधकामे सुरू आहेत.

महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाच्या अधिका-यांना अनधिकृत बांधकाम कारवाईचे अधिकार दिले आहेत, पण कित्येक वर्ष एकाच ठिकाणी ठाण मांडून बसलेल्या अधिकाऱ्यांचे त्या बांधकाम व्यावसायिकांशी अर्थपूर्ण संबंध आहेत. त्यामुळे महापालिकेकडून अनधिकृत बांधकामावर कारवाई करताना केवळ राजकीय पाठबळ नसलेल्या आणि सर्वसामान्य नागरिकांनी बांधकामे सरसकट पाडली जातात. त्यांच्या घरावर बुलडोझर चालवून आर्थिक चिरीमिरी दिलेल्या बांधकाम व्यावसायिकांच्या टोलेजंग इमारतींना अभय देण्याचे काम सुरू आहे. तळवडे, चिखली, मोशी, डुडुळगांव या भागात देखील पाच - दहा गुंठे जागा घेऊन गृहप्रकल्प उभे केले जात आहेत. महापालिकेचा आरक्षित भूखंड असलेल्या जागेवरदेखील तब्बल ४८ इमारती विनापरवानगी उभ्या केलेल्या आहेत.

तसेच छोटे बांधकाम व्यावसायिक हे थेट राजकीय नेत्यांची नावे घेऊन कारवाईला आलेल्या अधिकाऱ्यांना दमबाजी करत आहे. त्याचशिवाय संबंधित अधिका-यांना अनधिकृत बांधकामाच्या एका स्लॅपनुसार एक लाख रुपये दिले जात असल्याची चर्चा आहे. सदरील इमारती व्यावसायिक आणि गृहप्रकल्प उभारून नागरिकांना फ्लॅटची विक्री करण्यात येत आहेत. काही गृहप्रकल्प तयार करून त्यातील खोल्या भाड्याने दिल्या जात आहेत. आपल्या घरावर कारवाई होईल म्हणून अधिका-याविरोधात बोलण्यास नागरिक पुढे येत नाहीत.

### क्षेत्रीय अधिकारी कर्तव्यापासून काढतात पळ

» पिंपरी-चिंचवड महापालिकेने अनधिकृत / बिगरपरवाना बांधकामाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २६१,२६४, २६७ व ४७८ मधील तरतुदीनूसार महापालिका आयुक्त यांचे आदेश क्र.अति/३/ कावि/१०७/ २०१२ अन्वये पदनिर्देशित अधिकारी म्हणून कारवाई करण्याचे अधिकार क्षेत्रीय अधिकारी यांना प्रदान केलेले आहेत. तरी देखील त्या अनधिकृत बांधकामावर हातोडा टाकून बांधकामे पाडण्याची जबाबदारी क्षेत्रीय अधिकारी यांच्यावर असताना त्यांनी कर्तव्यापासून पळ काढत व जबाबदारी झटकून राजकीय दबावापोटी संबंधित अनधिकृत बांधकाम निष्काषित करण्याकडे दुर्लक्ष केल्याने त्या बांधकामांना अभय मिळत आहे.

# मुळशीत आणखी सहा हॉटेल, रेस्टॉरंटवर हातोडा!

## पीएमआरडीए ॲक्शन मोडवर : अनधिकृत हॉटेल पाडण्याचा धडाका सुरुच

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) मुळशी तालुक्यात सलग दुसऱ्या दिवशी कारवाई करत तब्बल सहा हॉटेलवर हातोडा मारला. भूगाव, भुकुम या परिसरात शुक्रवारी (दि. १९) निष्कासनाची कारवाई केली. मुळशी तालुक्यात कारवाईचा धडाका सुरू केला असून, अनधिकृत पब, बार अँड रेस्टॉरंटवर बुलडोझर चालवण्यात आला.

भूगाव व भुकुम (ता. मुळशी) येथील 'ड्रंक इन लेक', 'सँडलवूड', 'बनियार्ड ब्रिस्ट्रो', राजहंस रेस्टो अँड बार, 'टी' टू बार, 'टॅप्स अँड टॉक्स' या सहा अनधिकृत हॉटेलवर कारवाई केली.



पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे सकाळी १० वाजता निष्कासन कारवाई सुरू करण्यात आली. या ठिकाणी २८ हजार ५५५ चौरस फूट क्षेत्र निष्कासित करण्यात आले, अशी माहिती अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाचे उपजिल्हाधिकारी तथा सह-आयुक्त अनिल दौंडे यांनी सांगितले.

पीएमआरडीएच्या अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागातील अधिकाऱ्यांमार्फत अनधिकृत बांधकाम करू नये असे आवाहन करण्यात आले. निष्कासन कारवाई करताना पीएमआरडीएचे अधिकारी-कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. प्राधिकरण हद्दीतील उर्वरित सर्व पब, बार व रेस्टॉरंट्स यांचा सर्व्हे चालू असून अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई चालू राहणार आहे. जेसीबी पोकलेन, क्रेन, अग्निशामक दल आदींच्या माध्यमातून निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

### अनधिकृत होर्डिंगवरही कारवाई

» दरम्यान आकाशचिन्ह कारवाई विभागाने तहसीलदार सचिन म्हस्के यांच्या मार्गदर्शनानुसार कारवाई सुरू केली असून, नुकतीच या पथकाने शिंदेवाडी (ता. भोर) या ठिकाणी ४ अनधिकृत होर्डिंग भुईसपाट केले. तर, या ठिकाणचे १ होर्डिंग संबंधित चालकाने स्वतःहून काढून घेतले.

# ऑर्किड्स इंटरनॅशनल स्कूललाही दणका!

## पहिली ते दहावीचे अनधिकृत वर्ग चालवल्याप्रकरणी कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील उंड्री येथील ईरा एज्युकेशन सोसायटीतर्फे संचालित ऑर्किड्स इंटरनॅशनल स्कूलकडे कोणतीही शासनाची परवानगी नसताना इयत्ता पहिली ते दहावीचे अनधिकृत वर्ग चालविले जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी जिल्हा परिषदेने धडक कारवाई केली असून या स्कूलच्या विरोधात कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




अनधिकृत वर्ग चालविले जाण्याप्रकरणी पिंपरी-चिंचवडनंतर पुणे शहरात गुन्हा दाखल झाल्याची दुसरी घटना आहे. त्यामुळे आता पालकांनी चिंता व्यक्त केली असून त्यांना त्यांच्या पाल्याची काळजी वाटू लागली आहे. जिल्हा परिषदेचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी ज्ञानदेव आबाजी खोसे, (वय ५५, रा. श्रीगणेश सोसायटी, वाघोली) यांनी ऑर्किड्स इंटरनॅशनल स्कूलच्या आणि संस्थेचे अध्यक्ष जे विकोस्टा (रा. बेंगलोर), संचालक समीर गोरडे (रा. विमाननगर ) यांच्याविरुध्द अनधिकृत शाळा चालविल्याने गुन्हा दाखल करावा अशी फिर्याद दिली आहे. त्यानुसार कोंढवा पोलीस ठाण्यात शासनाची, पालकांची फसवणूक केल्याप्रकरणी उंड्री येथील ऑर्किड्स इंटरनॅशनल स्कूलवर गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑर्किड्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये एकूण २८७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेचे अध्यक्ष जे. डिकोस्टा (रा. बंगळुरु), संचालक समीर गोरडे आणि मुख्याध्यापिका अनिता नायर यांच्याकडून सदर शाळा चालविली जाते. या शाळेमधील पहिली ते दहावीचे वर्ग अनधिकृतरित्या चालवले जात असल्याचे निदर्शनास आले, असे जिल्हा परिषदेने सादर केलेल्या अहवालातून समोर आले. त्यानंतर फिर्यादी गटशिक्षणाधिकारी खोसे यांनी शाळेची पाहणी केल्यानंतर कोंढवा पोलिसांकडे फिर्याद दिली.

बालकांचा मोफत आणि सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम (आरटीई अ‍ॅक्ट २००९) चे कलम १८ अन्वये कोणतीही शाळा संबंधित सरकारच्या मान्यतेशिवाय किंवा ना हरकत प्रमाणपत्राशिवाय सुरू करता येणार नाही. कलम १८ (५) अनुसार राज्य शासन अथवा स्थानिक प्राधिकरणाच्या परवानगी अथवा मान्यता प्रमाणपत्राशिवाय नमूद शाळेमध्ये पहिली ते दहावीचे अनधिकृत वर्ग चालविण्यात येत आहेत.

ऑर्किड्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये पहिली ते दहावीचे अनधिकृत वर्ग चालवित असेल तर संबंधितांना १ लाख रु पर्यंत दंडाची रक्कम आणि त्यानंतरही वर्ग अनधिकृतरित्या चालू राहिल्यास १० हजार रुपये प्रतिदिवशी दंड करण्याची तरतूद आहे, अशा मजकुराची नोटीस स्कूलला १२ जुलै आणि १६ जुलै रोजी जिल्हा परिषदेच्या केंद्रप्रमुख शांता इचके, केंद्रप्रमुख लोणीकंद आणि अद्वैत चिंतामण, केंद्रप्रमुख शिंदवणे यांच्याकडून बजावण्यात आली होती. परंतु शाळेतील कर्मचाऱ्यांनी ती स्वीकारली नाही. तसेच जिल्हा परिषदेच्या केंद्र प्रमुखांना शाळेमध्ये प्रवेश करण्यास मज्जाव घालण्यात आला. त्यामुळे या शाळेतील विद्यार्थी संख्या तसेच फीसंदर्भात योग्य माहिती प्राप्त झाली नाही. अनेक वेळा विनंती केल्यानंतर नमूद शिक्षण संस्थेच्या सिक्युरिटी गार्डने शाळेत आत येण्यास परवानगी दिली. तरी या संस्थेच्या शाळेने अनधिकृत वर्ग सुरू ठेवून नमूद कायद्याचे उल्लंघन केले आहे, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

शाळाचालकांनी संगनमत करून पहिली ते दहावीचे अनधिकृत वर्ग चालू ठेवले असून अधिकृत वर्ग चालू करण्यासाठी शासनाची कोणतीही परवानगी घेतलेली नाही. पालकांकडून अनधिकृतपणे फी वसूल करून विद्यार्थी आणि पालकांची फसवणूक केलेली दिसून येत आहे. ही शाळा अनधिकृत असूनसुद्धा इतर शाळांना दाखल्याची मागणी करणे, विद्यार्थ्यांचे दाखले देणे, विद्यार्थ्यांचे मूळ जन्मप्रमाणपत्र अनधिकृतरित्या ताब्यात घेणे, अनधिकृतरित्या जनरल रजिस्टर क्रमांक एकमध्ये नावनोंदणी करणे, विद्यार्थी उपस्थितीपत्रक बनविणे, शाळेला शासनमान्यता नसताना असल्याचे भासविणे आदी बाबी या शाळेने केल्या आहेत. ही शाळा अनधिकृतरित्या सुरू असल्याने शासनास आवश्यक असलेला महसूल बुडून शासनाची फसवणूक केली आहे, असे जिल्हा परिषदेचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद आहे.

### पुण्यातील या शाळा आहेत अनधिकृत

» ऑर्किड्स इंटरनॅशनल स्कूल, नारायणा ई टेक्नो स्कूल, दी गोल्डन इरा इंग्लिश मीडियम स्कूल, फ्लोरिंग फ्लोरा इंग्लिश मीडियम स्कूल, ई. एम. एच. इंग्लिश मीडियम स्कूल, सी. टी. ई. एल. इंग्लिश मीडियम स्कूल, द टायगर इज इंटरनॅशनल स्कूल, मेरीगोल्ड इंटरनॅशनल स्कूल, शिव समर्थ इंग्लिश मीडियम स्कूल, दारूल मदिनाह स्कूल, टीम्स तकवा इस्लामिक स्कूल अ‍ॅड मक्तब, लीगसी हायस्कूल, इमॅन्युअल पब्लिक स्कूल

# कृषी पर्यटनासाठी "एनए'ची आवश्यकता नाही

## कृषी पर्यटनासाठी यापुढे शेतकऱ्यांना एनए (बिगर शेती) परवान्याची आवश्यकता नसल्याचे शासनाकडून स्पष्ट

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य शासनाने नुकतेच पर्यटन धोरण 2024 जाहीर केले आहे. यामध्ये पर्यटनास प्रोत्साहन देताना कृषी पर्यटन व्यवसाय यापुढे शेतीपूरक व्यवसाय म्हणून ओळखले जाणार आहे. तसेच कृषी पर्यटनासाठी यापुढे शेतकऱ्यांना एनए (बिगर शेती) परवान्याची आवश्यकता नसल्याचे शासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



राज्यातील पर्यटन स्थळांचे नियोजन आणि देखभाल व्हावी, पर्यटनस्थळांची अधिकाधिक प्रसिद्धी करण्यासाठी राज्य सरकारने पर्यटन धोरण २०२४ तयार केले आहे. पुढील १० वर्षांसाठी नियोजन करणारे धोरण जाहीर करण्यात आले आहे.

पर्यटन धोरणामध्ये यंदा पर्यटन घटकांना भांडवली गुंतवणूक प्रोत्साहन, अतिरिक्त चटई क्षेत्र, सीजीएसटी कराचा परतावा, वीजदरात सवलत, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना इतर वित्तीय प्रोत्साहन, व्याज व अनुदान प्रोत्साहन, नोंदणी व मुद्रांक शुल्कात सवलत देण्यात आली आहे. कृषी पर्यटनासाठी बिगर शेती अर्थात एनए ची गरज नसली तरी या उपक्रमाची स्थानिक महसुल विभागाला याची माहिती देण्यात यावी, असे शासनाने म्हटले आहे.

### क़ॅरॅव्हॅन पर्यटन

» राज्यात पर्यटनाच्या उद्देशाने क़ॅरॅव्हॅन चालवण्यासाठी मंजुरी देण्यात येत आहे. राज्य परिवहन आयुक्त याबाबत वाहनांची नोंदणी करण्याची अंमलबजावणी करणार आहे. क़ॅरॅव्हॅन सार्वजनिक पार्किंगच्या ठिकाणी प्राधान्याने स्थनिक प्राधिकरणांनी पार्किंगसाठी अशा वाहनांना परवानगी असेल.